17-03-2025-Dai-04FF_DH_PAN_20_08_2016-3.qxp 03/16/2025 10:12 PM Page 1



निवडक




**मांद्रे : भाजप मंडळ समितीची घोषणा करताना माजी आमदार दयानंद सोपटे. सोबत परेश सावंत, प्रदीप नाईक, धीरज मांद्रेकर व उत्तम पोखरे.**

## मांद्रेत आज भाजप पक्ष कार्यकर्त्यांचा मेळावा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**हरमल, दि. १६ :** मांद्रे भाजप मंडल अध्यक्ष व अन्य समिती तसेच आजी माजी पक्ष पदाधिकाऱ्याना मार्गदर्शन बैठक सोमवार दि. १७ रोजी संध्याकाळी ६.३० वाजता मांद्रे जिल्हा पंचायत सभागृहात आयोजित केल्याची माहिती मांद्रे मतदारसंघाचे माजी आमदार तथा प्रदेश सचिव, प्रवक्ता दयानंद सोपटे यांनी मांद्रे पक्ष कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले. या मार्गदर्शन बैठकीस राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, प्रदेश अध्यक्ष दामोदर नाईक तसेच अन्य पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत,असे माजी आमदार दयानंद सोपटे यांनी सांगितले.यावेळी
मांद्रे मंडल समितीची घोषणा करण्यात आली.मंडळ अध्यक्ष उत्तम पोखरे, उपाध्यक्ष रवी गोवेकर, प्राजक्ता कांनाईक, शांताराम परब, सरचिटणीस प्रदीप नाईक, परेश सावंत,चिटणीस धीरज मांद्रेकर, सेजल गावडे, प्रज्ञा पार्सेकर, अजय कळंगुटकर खजिनदार अमित शेट गावकर सदस्य रमाकांत पार्सेकर, आनिषा केरकर, जयंत केरकर, शिवा तीळवे, अभय नाईक, दिलीप वायंगणकर, कृष्णा चोपडेकर, प्रवीण किनळेकर, छाया साळगावकर,शिल्पा म्हामल,रघुनाथ जोशी,सुचिता नाईक,उमेश येशी,संगीता नाईक,विठू शेटगावकर,एकनाथ चोपडेकर,स्नेहा नाईक,शृंखला बागकर,प्रदीप परब व रुद्राक्ष मुरारी यांची निवड करण्यात आली. यावेळी अध्यक्ष उत्तम पोखरे, सरचिटणीस प्रदीप नाईक, परेश सावंत चिटणीस धीरज मांद्रेकर उपस्थित होते. परेश सावंत यांनी स्वागत तर अध्यक्ष उत्तम पोखरे यांनी आभार मानले.तरी भाजप पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन मंडळ अध्यक्ष उत्तम पोखरे यांनी केले आहे.

---

## आमोणकर विद्यामंदिराच्या शिक्षिका व विद्यार्थ्याचा सन्मान

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**म्हापसा, दि. १६ :** नवी दिल्ली येथे प्रजासत्ताकदिन सोहळ्यात सहभागी झालेल्या जी.एस. आमोणकर विद्या मंदिरातील एन. सी. सी कॅडेट श्रीदित्य सावळ याचा राज्यपाल पी. एस. श्रीधरन पिल्लई यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. प्रजासत्ताकदिन सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या प्रधानमंत्री बॅनर स्पर्धेत गोवा–कर्नाटक पथकाला प्रथम पारितोषिक प्राप्त झाले होते. विद्यार्थ्यांना प्रत्येक क्षेत्रात परिपूर्ण बनवण्यासाठी शिक्षकांची महत्त्वपूर्ण भूमिका असते. एन. सी. सी कॅडेट श्रीदित्य सावळ यांच्या उपलब्धी मागे जी.एस. आमोणकर विद्यामंदिरातील शिक्षिका फर्स्ट रेंक ऑफिसर डॉ. अमिता हुमरस्कर यांचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याबद्दल त्यांचाही ह्या सोहळ्यात प्रशस्ती पत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी शाळेची मुख्याध्यापिका सौ. पूजा दळवी व उपमुख्याध्यापिका झेना व्हियेगस उपस्थित होत्या. शाळेचे अध्यक्ष ॲड. संजय उसगावकर यांनी श्रीदित्य सावळ व शिक्षिका अमिता हुमरस्कर यांचे अभिनंदन केले.

---

## गांधर्व महामंडळच्या परीक्षेत राधाकृष्ण संगीत अकादमीचे ७४ विद्यार्थी उत्तीर्ण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १६ :** हरवळे साखळी येथील राधाकृष्ण संगीत अकादमीचे संस्थापक गुरूवर्य रामचंद्र धोंडू नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली डिसेंबर २०२४ मध्ये अखिल भारतीय गांधर्व महामंडळ मुंबईतर्फे घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेमध्ये अकादमीचे एकूण ७४ विद्यार्थ्यी उत्तीर्ण झाले आहेत.
प्रारंभिक परीक्षेत आयुष माजिक, खुशाल कुकूटलापल्ली, दक्ष गावस, कविश राणे, महादेव गावडे, चैतन गावडे, सृष्टी गावकर, गणेश गावकर, सावी साखळकर, नितीश राणे, साची गावडे, अवनी परब, देवांशी गावडे, अक्षता गावडे, स्वरा गावडे, ओजस्वी शिरोडकर, वृषीका गावस, ओम कुडतरकर, प्रेमनाथ नेवगी, ऋषी मुननकर, निष्कर्ष कुडास्कर, संगीता गावकर, विराज परब, दर्शना न्ईबागकर, स्ई उमर्ये, रेश्मा शेट कुंभार, प्रथमेश भगत, ग्रितीक काटकर, आदर्श नाईक, आहाना गावडे, शुभम गावस, काव्या गावडे.
प्रवेशिका प्रथम मध्ये ओंकार पावसकर, अवनी गावस, राजवी मराठे, सार्थक वायंगणकर, परिधी गावस शेटकर, साईराज पिळगावकर, सानिका गावस, राघलो गावस, दत्तप्रसाद नाईक, मिनाक्षी चेल्लम, गोरांग नार्वेकर, कनिका गावडे, समर्थ पटेकर, भूमी कार्बोटकर, श्रीराम लोटलीकर.
प्रवेशिका पूर्णमध्ये सर्वेश माशेलकर, हेमांगी गावस, आश्रा गावडे, सुविर नावेलकर, शरद गावस, शुभम राणे, रूद्र गावकर, श्रेया मळीक, मयुरेश सुर्लकर, प्रणिता सावंत, मंथन सावंत, अनुष्का नाईक, शंकर च्यारी, सरीता आपटे, मृणाली सुर्लकर, हर्षदा गावकर,रुपाली गावकर,कनक गावकर,अनुजा नाईक,अंतरा सिद्धये. मध्यमा प्रथम मध्ये स्विटी सावंत,प्रेमनाथ गावडे,कृष्णा नाईक,दिपराज नाईक,केशव गावकर. मध्यमा पूर्ण मध्ये विजय शिरोडकर यांनी यश मिळविले. गुरूवर्य श्री रामचंद्र धोंडू नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली गोवा, महाराष्ट्र तसेच कर्नाटकातुन जवळ जवळ १३५ विद्यार्थ्यी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेत आहेत.अकादमीतर्फे उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना येत्या मासिक संगीत सभेमध्ये मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरीत करण्यात येणार आहेत असे अकादमीचे सचीव श्री दत्ताराम माडकर यांनी कळविले आहे.

# मुंबई इंडियन्सला दुसऱ्यांदा जेतेपद

## दिल्ली कॅपिटल्सचा ८ धावांनी पराभव : हरमनप्रीतचे अर्धशतक

**मुंबई, दि. १६ :**



डब्ल्यूपीएल २०२५ च्या अंतिम सामन्यात, मुंबई इंडियन्स संघाने दिल्ली कॅपिटल्स संघाचा ८ धावांनी पराभव करत थरारक विजय मिळवला आणि दुसऱ्यांदा या स्पर्धेचा विजेता ठरला. अंतिम फेरीत मुंबईने महत्त्वाच्या क्षणी विकेट घेतल्या. याच कारणामुळे दिल्लीच्या संघाला छोट्या लक्ष्याचाही यशस्वी पाठलाग करता आला नाही. प्रथम फलंदाजी करताना मुंबई इंडियन्सने १४९ धावा केल्या, त्याला प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ केवळ १४१ धावाच करू शकला. मुंबई इंडियन्सला विजयानंतर किती बक्षिसाची रक्कम मिळाली जाणून घ्या.

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली मुंबई इंडियन्सने दुसरे डब्ल्यूपीएल जेतेपद पटकावले आहे. याआधी २०२३ मध्येही मुंबई संघ दिल्ली कॅपिटल्सला हरवून चॅम्पियन बनला होता. मुंबईने डब्ल्यूपीएल च्या पहिल्याच सीझनचे विजेतेपद आपल्या नावे केले होते. दुसरीकडे, दिल्ली कॅपिटल्सच्या नशीबाने त्यांना यंदाही साथ दिली नाही. दिल्लीचा संघ सलग तीन वर्षे पहिल्या स्थानी येत अंतिम फेरीत पोहोचला आहे, पण संघाला पराभवाला सामोर जावे लागले. दिल्लीचा संघ लीग टप्प्यात चांगली कामगिरी करतो, पण फायनलमध्ये संघाला निराशेला सामोर जावे लागले आहे.

आतापर्यंत डब्ल्यूपीएलचे तीन हंगाम झाले आहेत आणि तिन्ही वेळा दिल्लीने गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले आहे आणि अंतिम फेरीत प्रवेश केला आहे, परंतु ते एकदाही विजेतेपद मिळवू शकले नाही. प्रत्येक वेळी विजेतेपद मिळवण्याचे त्यांचे स्वप्न भंगले आहे.

विजेतेपद पटकावल्यानंतर मुंबई इंडियन्स संघाला ६ कोटी बक्षिसाची रक्कम देण्यात आली आहे तर मुंबईविरूद्ध फायनल गमावल्यानंतर दिल्ली कॅपिटल्स संघाला ३ कोटी बक्षिसाची रक्कम मिळाली आहे. मागच्या वेळीही विजेत्या आणि उपविजेत्याला हिच बक्षीस रक्कम देण्यात आली होती. तर मुंबई इंडियन्सची फलंदाज नॅट स्किव्हर ब्रंटला सीझनमध्ये सर्वाधिक ५२३ धावा केल्याबद्दल ऑरेंज कॅप देण्यात आली. तर मुंबईची फिरकीपटू अमेलिया कर हिला पर्पल कॅप देण्यात आली जिने १८ विकेट्स घेतले.

डब्ल्यूपीएल २०२५ च्या अंतिम सामन्यात, दिल्ली कॅपिटल्सची कर्णधार मेग लॅनिंगने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. यानंतर हरमनप्रीत कौरने मुंबईसाठी चमकदार कामगिरी केली. तिने अर्धशतक झळकावत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. हरमनप्रीतने ४४ चेंडूत ९ चौकार आणि २ षटकारांसह ६६ धावा केल्या.

नॅट स्किव्हर ब्रंटने ३० धावांचे योगदान दिले. या खेळाडूंमुळेच मुंबई संघाला १४९ धावांपर्यंत मजल मारता आली. यानंतर दिल्ली कॅपिटल्सकडून मेरीजेन कॅपने सर्वाधिक ४० धावा केल्या. निक्की प्रसादने २५ धावांचे योगदान दिले, मात्र हे खेळाडू दिल्ली संघाला विजयापर्यंत नेण्यात अपयशी ठरले.

# संगीताकडे बघण्याची दृष्टी शुद्ध असावी

**अनिल सामंत : धुळेर येथे रमेश सप्रे यांच्या हस्ते गणेश गुरूकुल सभागृहात उद्‌घाटन**

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. १६ :** स्वरप्रिया संगीत अकादमीच्या स्थापनेने म्हापशाच्या सांस्कृतिक इतिहासात नव पर्व सुरू झाले आहे. संगीताकडे बघण्याची दृष्टी शुद्ध व्हायला हवी. म्हापशात सांस्कृतिक पोकळी निर्माण झाली आहे, ती भरून काढण्यासाठी गणेश गुरूकुलची स्थापना झाली आहे, असे मत गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष तथा समीक्षक प्राचार्य अनिल सामंत यांनी येथे व्यक्त केले.

धुळेर म्हापसा येथील गणेश गुरूकुल संस्थेच्या स्वरप्रिया संगीत अकादमीचे सोमवारी नामवंत प्रवचनकार रमेश सप्रे यांच्या हस्ते गणेश गुरूकुल सभागृहात उद्‌घाटन झाले. त्यावेळी सन्मानीय पाहुणे म्हणून प्राचार्य सामंत बोलत होते. व्यासपीठावर गणेश गुरूकुल चे संस्थापक माजी मंत्री दयानंद नार्वेकर व सुषमा नार्वेकर,



**म्हापसा : स्वरप्रिया संगीत अकादमीचे उद्‌घाटन करताना रमेश सप्रे. सोबत ॲड. दयानंद नार्वेकर, सुषमा नार्वेकर, प्राचार्य अनिल सामंत व डॉ. प्रवीण गावकर.**

संजीवन संगीत अकादमीचे संस्थापक डॉ. प्रविण गावकर उपस्थित होते. या अकादमीत संजीवन संगीत अकादमीच्या सहयोगाने गायन, वादन संगीत वर्ग चालतील. नवीन शैक्षणिक धोरणात कला विषयाला महत्व आहे तो विषय केवळ मोकळ्या जागा भरण्यासाठी नाही याबद्दल सांगून प्राचार्य सामंत म्हणाले, संगीत विषयाचे केवळ व्याकरण शिकवले जाता कामा नये तर त्यात अंतःकरण हवे.

रमेश सप्रे म्हणाले, संगीत हे रसयुक्त आहे ते रुक्ष नाही. आपण तंत्राकडे वळलोय आणि मंत्र विसरलोय. गणेश गुरूकुलने संस्कार वर्ग सुरू केला आणि आता संगीत वर्ग ही गुरुकुलाची परंपरा आहे. ॲड. दयानंद नार्वेकर यांनी प्रास्ताविकात ही अकादमी आपली कन्या स्व. प्रियांका नार्वेकर हिच्या स्मरणार्थ स्थापन केली असल्याचे सांगितले व म्हापसा परिसरातील होतकरूना त्याचा लाभ व्हावा हा उद्देश असल्याचे सांगितले. विवेका वर्दे या बालिकेने स्वागत केले. डॉ. प्रविण गावकर यांनी आभार मानले.

मानसी वाळवे यांनी सूत्रसंचालन केले. या निमित्ताने पंडित जितेंद्र अभिषेकी व कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या निवडक रचनांवर आधारित गोमंतप्रतिभा कार्यक्रम सादर झाला. त्याची संकल्पना व संगीत संयोजन डॉ. प्रविण गावकर यांचे होते व त्यात संजीवन संगीत अकादमीच्या विद्यार्थिनी पल्लवी पाटील, आरती गावडे, अश्विनी अभ्यंकर, सिया पै, मधुरा नवघरे, द्रुवी च्यारी व उर्वी फडके यांनी गायन केले. रोहिदास परब, दत्तराज म्हाळशी, किशोर तेली व आदित्य गावकर यांनी साथसंगत केली व मानसी वाळवे यांनी निवेदन केले.



**मुरमुसे तुये : 'वाचन साधना'वर कार्यशाळेप्रसंगी सुभाष शेटगावकर यांना स्मृतिचिन्ह प्रदान करताना मुख्याध्यापिका सुनीता शेटगावकर. सोबत प्रतीक्षा पटेकर, नारायण सावंत व इतर.**

# तुये मुरमुसे सरकारी विद्यालयात 'वाचन साधना'वर कार्यशाळा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १६ :** मुरमुसे तुये येथील सरकारी प्राथमिक विद्यालयात गोव्याचे पहिले मुख्यमंत्री भाऊसाहेब बांदोडकर यांच्या ११४व्या जयंतीचेनिमित्त साधून विद्यार्थी दिवसा निमित्त वाचन साधना या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत निवृत्त शिक्षक सुभाष शेटगावकर यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी अक्षर बोध, नजरेचा सराव, दृष्टीचा अवाका, शब्द बोध, वाक्य बोध, आकलन, अर्थग्रहण इत्यादींवर प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला भाऊसाहेब बांदोडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी दयानंद बांदोडकर – गोव्याचे पहिले मुख्यमंत्री या विषयावर विद्यार्थी व शिक्षक यांनी आपले विचार मांडले तसेच अन्य मान्यवरांची भाषणे झाली.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते विविध सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात आलीय.

शिक्षिका प्रतीक्षा पटेकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शिक्षक नारायण सावंत यांनी मान्यवरांचा परिचय व स्वागत केले. मुख्याध्यापिका सुनीता शिरोडकर यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे सुभाष शेटगावकर यांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

# आग्नेल उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**वेर्णा, दि. १६ :** वेर्णेच्या फादर आग्नेल उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिवस विद्यार्थानी साजरा केला.

यावेळी व्यासपीठावर दोनापावला येथील केंद्र सरकारच्या राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे सहयोगी संशोधक डेफिल्गो फर्नांडिस प्रमुख पाहुण्या समवेत विद्यालयाचे प्राचार्य ब्रुनो काव्हॉलो, उपप्राचार्य विवेक रॉड्रिग्स, जीवशास्त्राच्या शिक्षिका रुकिना मोन्तेरो परेरा, भूगर्भशास्त्राचे शिक्षक चारुदत कामत उपस्थित होते.

समई प्रज्वलित करून प्रमुख पाहुणे डेफिल्गो फर्नांडिस यांनी कार्यक्रमाचे उद्‌घाटन केले. शिक्षक चारुदत कामत यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि सांगितले की, अंटार्क्टिका खंडावर मिळणारी सूक्ष्म उल्कापिंड आणि हिंद महासागरा च्या खोल भागांत मिळणारे वेगवेगळे सेडीमेन्टस यावर त्यांनी संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आहे. तसेच २०१५ मध्ये अंटार्क्टिका खंडावर संशोधनास निघणाऱ्या शास्त्रज्ञाबरोबर जाण्याचे भाग्य त्यांना लाभलेले आहे तसेच शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन त्यांना मिळालेले आहे, असे सांगितले.

सूर्यमाळेतील ग्रहांची निर्मिती, मंगळ आणि गुरू ग्रहांमधील लघुग्रहांचा पट्टा, पृथ्वीवर पोहोचणाऱ्या अलौकिक वस्तू, पृथ्वीच्या वातावरणात तरंगणाऱ्या धूमकेतूंच्या धुळीचे परिणाम, अंटार्क्टिकामधील बदलत्या पर्यावरणावर शास्त्रज्ञांचे मार्गदर्शन, महाकाय बर्फ, अंटार्क्टिकावरील भारतीय शास्त्रज्ञांची मैत्री, भारती आणि दक्षिण गंगोत्री संशोधन केंद्र, रमणीय निसर्ग, महाकाय समुद्राच्या लाटा तसेच संशोधन जहाजाबद्दल विद्यार्थ्यांना चल चित्रांच्या आधाराने माहिती दिली. विद्यार्थिनी स्वेला मिरांडा हिने राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे महत्त्व स्पष्ट केले.प्राचार्य ब्रुनो काव्हॉलो यांनीही राष्ट्रीय विज्ञान दिवसाचे महत्त्व स्पष्ट केले. उपप्राचार्य विवेक रॉड्रिगीस यांनी सर्वांचे आभार मानले. विद्यार्थीनी मेझेल तेशेरा, डिनोरा सेरराव, फेडोरा गावकर यांचा उत्कृष्ट हस्तलेखनाचे विद्यार्थी म्हणून सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनी पुजा कुमारी हिने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संचालन केले.




**वेर्णा : रसायनशास्त्र विषयात पोस्टर स्पर्धेत विजेते. बाजूस अमिता मोहनन, ऑस्कर डा कोस्टा, डेफिल्गो फर्नांडिस, चारुदत कामत व रुकिना मोन्तेरो परेरा.**

# डिचोली शिवजयंती उत्सव समितीतर्फे आज तिथीनुसार शिजयंती

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १६ :** डिचोली सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीतर्फे सोमवार दि. १७ रोजी तिथीनुसार शिवजयंती सोहळ्याचे आयोजन जुना बसस्थानक येथे करण्यात आल्याची माहिती आयोजन समितीचे मंदार गावडे, युवराज गावकर पापुराज मयेकर,किरण तुळपुळे, वासुदेव च्यारी, गोविंद साखळकर, विजय होबळे, शांतीसागर कृष्णा मराठे, भोला नाथ गाड आदींनी पत्रकार परिषदेत दिली तिथीनुसार आयोजित करण्यात आलेल्या या शिवजयंती उत्सवात सकाळी सात वाजता शिवप्रेमी जुना बस स्थानक येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ जमतील त्या ठिकाणी पुष्पहार अर्पण करतील त्यानंतर मूर्तिपूजा आरती तीर्थप्रसाद कार्यक्रम होईल. सायंकाळी चार वाजल्यापासून सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शिवरायांच्या जीवनावर सत्य विजय नाईक यांचे व्याख्यान होणार आहे या सोहळ्यात सर्वांनी उपस्थित राहावे असे आव्हान यावेळी करण्यात आले.




**डिचोली : शिवजयंती सोहळ्याची माहिती देताना मंदार गावडे. बाजूला युवराज गावकर, पापुराज मयेकर, किरण तुळपुळे, वासुदेव च्यारी गोविंद साखळकर, विजय होबळे व शांतीसागर कृष्णा मराठे.**

# ऑलिम्पिकमध्ये टी–२० क्रिकेट खेळण्यासाठी विराट कोहली निवृत्ती घेणार माघार ?

**मुंबई, दि. १६ :**

विराट कोहलीने टी–२० विश्वचषक २०२४ जिंकल्यानंतर क्रिकेटच्या सर्वात लहान फॉरमॅटमधून निवृत्ती घेतली आहे. विराटने टी–२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतली असली तरी तो आता आयपीएलमध्ये खेळताना दिसतो. विराट अजूनही कसोटी आणि वनडे क्रिकेटमध्ये भारताचं प्रतिनिधीत्त्व करत आहे. दरम्यान आयपीएल २०२५ पूर्वीच्या आरसीबीच्या कार्यक्रमामध्ये विराट कोहलीने अनेक प्रश्नांची उत्तरं दिली आहेत.



शनिवारी (१५ मार्च) आरसीबी इनोव्हेशन लॅब इंडियन स्पोर्ट्स समिटमध्ये बोलताना विराटने टी–२० क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याबद्दल त्याच्या योजनांबद्दल सांगितले. कोहलीने सांगितले की ऑलिम्पिकमध्ये खेळणे ही त्याच्यासाठी एक आकर्षक कल्पना होती. विराट कोहलीने क्रिकेटमधून पूर्णपणे निवृत्ती घेतल्यानंतर पुढील योजनांबद्दल विराटला विचारले असता तो म्हणाला की, निवृत्तीनंतर मी काय करेन हे मला अजूनतरी माहीत नाही. नुकताच मी एका टीममेटला हाच प्रश्न विचारला आणि मला तेच उत्तर मिळाले. होय, पण खूप प्रवास नक्कीच करेन.

स्पोर्ट्स समिटमध्ये अँकर इसा गुहा यांनी कोहलीची मुलाखत घेतली. एलए ऑलिम्पिकमध्ये खेळण्यात रस आहे का, असा प्रश्न तिने विराटला विचारला. या प्रकरणावर बोलताना कोहलीने गंमतीने सांगितले की, भारत ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदकाचा सामना खेळत असेल तरच एका अटीवर परत खेळायला उतरेन.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १९४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 194 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .